
हृदय तू रड,
पण कधीही खचून जावू नको.



लेखनः ग्लैन रिंगट्वैथ, चित्रः शार्लेट पार्दी

मराठी: अश्विनी बर्वे

‘डू नकोस, हृदया, पण कधीही तुटू नकोस' हे एक अप्रतिम पुस्तक आहे. मी अनेकदा आपल्या दुःखाची तुलना केकच्या पिठात मीठ घालण्याशी करते—त्यामुळे त्याचा गोडवा अधिक खुलून येतो. प्रेम आणि विरह एकमेकांत गुंफलेले आहेत—एकाला समजून घेतल्याशिवाय आपण दुसऱ्याला समजू शकत नाही.

जेड ब्लेक, न्यू मेक्सिको ग्रीफ सेंटर

“समृद्ध व प्रभावी”

-न्यू यॉर्क टाइम्स

आता मृत्यूचा अर्थ समजून घेण्याविषयीचे हे चाणाक्ष आणि कल्पक बालपुस्तक आले आहे—हे एक अनमोल रत्न आहे.

– ब्रेन पिकिंग्ज

आपल्या प्रियजनांना निरोप द्यायला शिकण्याची ही कथा आहे. 'क्राय, हार्ट, बट नेव्हर ब्रेक' आपल्याला दाखवते की मृत्यू हा जीवनाचा एक नैसर्गिक भाग आहे – आवश्यक आणि अटळ दोन्ही.



माझी आई, लोन रिंगटवेथ मॅडसेन
हिच्या प्रेमळ स्मृतीस

हृदय, तू रड,
पण कधीही खचून जावू नको



लेखनः ग्लैन रिंगट्वैथ, चित्रः शार्लेट पार्दी
मराठी: अश्विनी बर्वे




उत्तरेला दूरवर एक छोटेसे, आरामदायी घर होते.

तिथे चार मुले त्यांच्या लाडक्या आजीसोबत राहत होती.

आजी एक प्रेमळ स्त्री होती;


तिने अनेक वर्षे या मुलांची काळजी घेतली होती.

आता कोणीतरी भेटायला आले होते.



मुलांना भीती वाटू नये म्हणून, त्या पाहुण्याने आपला विळा दाराबाहेर ठेवला होता. तरीही, मुलांना माहीत होतं की तो पाहुणा म्हणजे मृत्यू होता.सर्वात मोठा नेल्स आणि त्याची बहीण सोनिया यांनी दुःखाने जड झालेले डोळे मिटून घेतले.सर्वात लहान कॅस्परने त्या पाहुण्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. पण सर्वात लहान आणि नेहमीच संकटात सापडणारी लिआ, थेट मृत्यूच्या डोळ्यात डोळे घालून बघत होती.





त्या शांततेत मुलांना त्यांच्या आजीचा श्वासोच्छ्वास ऐकू येत होता. तिचा घरघरणारा श्वास अगदी टेबलापाशी बसलेल्या पाहुण्यासारखाच होता. तो तिला घेऊन जायला आला आहे आणि वेळ कमी उरला आहे, हे त्यांना कळून चुकले होते.







मृत्यूची एकमेव मैत्रीण रात्रच आहे हे सर्वांना माहीत असल्याने, मुलांनी पटकन एक योजना आखली. ते मृत्यूला रात्रभर कॉफी पाजून त्याला आजीपासून दूर ठेवणार होते. यामुळे त्याला पहाटे आजीशिवायच परत जावे लागेल.

म्हणून जेव्हा जेव्हा मृत्यूचा कॉफीचा कप रिकामा व्हायचा, तेव्हा नील्स विचारायचा, "आणखी कॉफी हवी का, साहेब?“ आणि मृत्यू होकारार्थी मान डोलावायचा. डेथला त्याची कॉफी कडक आणि दुधाशिवाय आवडायची, आणि थोडा वेळ बसून आराम करण्याची संधी मिळाल्याने तो आनंदी होता.



वेळ निघून गेला. अखेरीस, तो तयार झाला. त्याने आपला हाडकुळा हात प्याल्यावर ठेवला आणि इशारा केला, "आता पुरे."

मग लिआ, जी रात्रभर मृत्यूला न्याहाळत होती, पुढे आली आणि तिने मृत्यूचा हात धरला."अरे मृत्यू," ती म्हणाली, "आमची आजी आम्हाला खूप प्रिय आहे. तिला का मरावे लागत आहे?"

काही लोक म्हणतात की मृत्यूचे हृदय निर्जीव आणि कोळशाच्या ढेकळासारखे काळे असते. पण ते खरे नाही. त्याच्या काळ्या झगाखाली, त्याचे हृदय सर्वात सुंदर सूर्यास्तासारखे लालसर असते, जे जीवनावरील असीम प्रेमाने धडधडत असते.





मृत्यूला मुलांना समजायला मदत करायची होती.

म्हणून तो म्हणाला, "मला तुम्हाला एक गोष्ट सांगायची आहे."

आणि त्याने एका दमदार, गोड आवाजात बोलायला सुरुवात केली." ही गोष्ट खूप खूप वर्षांपूर्वीची आहे म्हणून ती फक्त मलाच आठवते, एके काळी,. तिथे दोन भाऊ राहत होते. एकाचं नाव दुःख, आणि दुसऱ्याचं होतं शोक. ते खिन्न होऊन ते त्यांच्या दरीत इकडेतिकडे भटकत असत. ते खूप हळू आणि जड पावलांनी चालायचे. कारण ते कधीच वर बघत नसत, टेकडीवरील सावल्यांच्या पलीकडे कधीच पाहत नसत."





त्या टेकड्यांवर खुशी आणि आनंदी नावाच्या दोन बहिणी राहत होत्या. त्या तेजस्वी आणि प्रसन्न होत्या, आणि त्यांचा प्रत्येक दिवस आनंदाने भरलेला होता. केवळ एका सावलीमुळे त्यांना काहीतरी कमी असल्याची जाणीव झाली. ते काय आहे हे त्यांना माहीत नव्हतं, पण त्यांना निश्चितपणे जाणवत होतं की त्या त्यांच्या आनंदाचा पुरेपूर उपभोग घेऊ शकत नाहीत. मृत्यूने पाहिले की लिआने होकारार्थी मान डोलावली. "मला वाटतं, पुढे काय झालं असेल याचा तुम्ही अंदाज लावू शकता."





मग एके दिवशी ते दोन भाऊ आणि त्या दोन बहिणीना भेटले. दुःख लगेचच आनंदीच्या प्रेमात पडले आणि आनंदीचेही त्याच्यावर प्रेम जडले. शोक आणि ख़ुशीच्या बाबतीतही असेच घडले. ते एकमेकांशिवाय जगू शकत नव्हते.



या दोन्ही विवाहाच्या भव्य सोहळ्यानंतर, ती दोन जोडपी एकमेकांना लागून असलेल्या दोन घरांमध्ये राहू लागली; त्यातील अर्धे घर टेकडीच्या पायथ्याशी आणि अर्धे माथ्यावर होते. त्यामुळे, त्या दोन घरांमध्ये समान अंतर होते. ती दोन्ही जोडपी खूप म्हातारपणीपर्यंत जगली. जेव्हा मृत्यूचा दिवस आला, तेव्हा दुःख आणि आनंदी एकाच दिवशी मरण पावले. शोक आणि ख़ुशीसुद्धा. कारण त्यांच्या एकत्र असण्याचा आनंद इतका मोठा होता की ते एकमेकांशिवाय जगूच शकत नव्हते.






“ही एक चांगली गोष्ट आहे," नेल्स म्हणाला.
“जीवन आणि मृत्यूच्या बाबतीतही तेच आहे,"
मृत्यू म्हणाला.

"मृत्यू नसता तर जीवनाला काय किंमत
राहिली असती? पाऊस नसता तर
सूर्यप्रकाशाचा आनंद कोण घेणार? रात्र नसती
तर पहाटेची वाट कोण पाहणार?“

मृत्यूचा मुद्दा त्यांना पूर्णपणे समजला आहे
की नाही, याबद्दल मुलांना खात्री नव्हती, पण
तो बरोबर आहे असे त्यांना कुठेतरी वाटत
होते.



अखेरीस, मृत्यू उठला. वर जाण्याची वेळ झाली होती. रात्रीतून एक अस्पष्ट सोनेरी रेषा पुढे सरकत होती.कॅस्परला मृत्यूला थांबवायचे होते, पण नेल्सने त्याला थांबवले. "नाही," नेल्स म्हणाला.

"जीवन पुढे जात आहे. ते असंच असायला हवं."

काही क्षणांनंतर, मुलांना वरच्या मजल्यावरील खिडकी उघडल्याचा आवाज आला .मग, आक्रोश आणि कुजबुज यांच्या मधल्या आवाजात, मृत्यू म्हणाला, "उड, आत्म्या, उडून जा."





मुले घाईघाईने वरच्या मजल्यावर गेली.


ती दबक्या पावलांनी आजीच्या खोलीत शिरली.

आजीचा मृत्यू झाला होता.

.सकाळच्या मंद वाऱ्याने पडदे फडफडत होते

मुलांकडे पाहत मृत्यू शांतपणे म्हणाला,

"तुम्ही रडू शकतात, पण कधीही खचून जाऊ नका. तुमच्या दुःखाचे अश्रू तुम्हाला नवीन आयुष्य सुरू करण्यास मदत करोत."मग तो निघून गेला.





त्यानंतर, जेव्हा जेव्हा मुले आजीच्या खोलीतील खिडकी उघडायचे, तेव्हा त्यांना तिची आठवण यायची. आणि जेव्हा जेव्हा वाऱ्याची झुळूक त्यांच्या चेहऱ्यांना स्पर्श करायची, तेव्हा त्यांना आजीच्या स्पर्शाची जाणीव व्हायची.





त्यानंतरच्या वर्षांत, मुलांनी आनंद आणि दुःख दोन्ही अनुभवले, पण त्यांना मृत्यूचे शब्द नेहमीच आठवत राहिले. त्यांच्या हृदयाला त्याने दिलासा मिळाला. त्यांची हृदये दुःख करत रडली, पण ती कधीही खचली नाहीत.





ग्लेन रिंग्सविथ हे एक प्रसिद्ध आणि पुरस्कार विजेते डॅनिश बालसाहित्य लेखक आहेत. त्यांनी लहान मुलांसाठी आणि किशोरवयीन मुलामुलींसाठी ४० हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या पुस्तकांचे अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. ते उत्तर डेन्मार्कमध्ये राहतात.

शार्लेट पार्दी ही एक लोकप्रिय डॅनिश चित्रकार आहे, जिने २००० साली प्रकाशित झालेल्या तिच्या पहिल्या पुस्तकापासून अनेक पुस्तकांना चित्रे काढली आहेत. ती जलरंग आणि ॲक्रिलिक या मिश्र माध्यमांचा वापर करते. तिच्या 'क्राय, हार्ट, बट नेव्हर ब्रेक' या पुस्तकातील चित्रे २००३ साली बोलोग्ना पुस्तक मेळ्यात प्रदर्शित करण्यात आली होती. ती उत्तर कोपनहेगनमधील एका मोठ्या जंगलाजवळ राहते.

रॉबर्ट मोउलथ्रॉपते एक पुरस्कार विजेते नाटककार आहेत, जे न्यूयॉर्क शहरात राहतात आणि काम करतात. त्यांनी दोन प्रशंसित लघुकथा संग्रह लिहिले आहेत. त्यांचे मुलांसाठीचे नाटक, 'जॅक द प्रिन्स ऑफ आयर्लंड', सर्वप्रथम मॅनहॅटन चिल्ड्रन्स थिएटरमध्ये रंगमंचावर सादर झाले.

